# महाराष्ट्र शासन

# नागरिकांची सनद

## विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय,
## अमरावती विभाग, अमरावती

# विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयाची रचना दर्शविणारे विवरणपत्र

| विभागीय शिक्षण उपसंचालक, अमरावती | | | | |
|---|---|---|---|---|
| **सहाय्यक शिक्षण संचालक** | **शिक्षण उपनिरिक्षक** | **शिक्षण उपनिरिक्षक/ शास्त्र सल्लागार** | **लेखाधिकारी** | **कनिष्ठ प्रशासन अधिकारी (आस्थापना)** |
| उच्च माध्यमिक विभाग व विद्या शाखा | माध्यमिक-अ<br>माध्यमिक-ब<br>माध्यमिक-क | प्राथमिक - अ<br>प्राथमिक - ब<br>डी.एड.आस्थापना | वित्त - अ<br>वित्त - ब<br>वित्त — क<br>पेन्शन- एनजी/जी<br>रोखपाल | आस्थापना - अ<br>आस्थापना - ब<br>आस्थापना - क<br>आस्थापना - ओ<br>लघुलेखक<br>आवक शाखा<br>जावक शाखा |

## विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयाच्या अधिपत्याखालील येणारे विभागीय कार्यालय प्रमुख/ जिल्हा कार्यालय प्रमुख/ तालुका कार्यालय प्रमुख

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पिठासीन अधिकारी, शाळा न्यायाधिकरा, अमरावती | प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अमरावती अकोला वाशिम यवतमाळ बुलढाणा | प्राचार्य, शासकीय विद्यानिकेतन, अमरावती केळापुर | शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, अमरावती अकोला वाशिम यवतमाळ बुलढाणा | शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, अमरावती अकोला वाशिम यवतमाळ बुलढाणा | शिक्षणाधिकारी (योजना) जिल्हा परिषद, अमरावती अकोला वाशिम यवतमाळ बुलढाणा | अधिक्षक वेतन व भ.नि.नि. पथक (माध्यमिक) अमरावती अकोला वाशिम यवतमाळ बुलढाणा | अधिक्षक वेतन व भ.नि.नि. पथक (प्राथमिक) अमरावती अकोला वाशिम यवतमाळ बुलढाणा | लेखाधिकारी (शिक्षण विभाग) अमरावती अकोला वाशिम यवतमाळ बुलढाणा | शासकीय अध्यापक विद्यालय, (पुरूष) अमरावती, (ओल्ड डिप्टी) अमरावती, (मुली) अकोला, (उर्दू) बाळापुर |

# विभागीय शिक्षण उपसंचालक, अमरावती विभाग (खुद्द) नागरिकांची सनद

## प्र स्ता व ना

मनुष्यबळ विकासाचे एक प्रभावी साधन म्हणून “ शिक्षण” ही बाब अत्यंत महत्वपूर्ण ठरते. ६ ते १४ वयोगटाच्या सर्व मुलांना प्राथमिक शिक्षण पुरविणे हे शासनाचे घटनात्मक दायित्व आहे. महाराष्ट्र शासनाच्या (शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या) अधिनस्त असलेल्या विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, अमरावती कडुन भविष्यात उज्वल पिढी घडवण्याकरिता तसेच आर्थिक, सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टीने शैक्षणिक पायाभूत सुविधा निर्माण करण्याकरिता विविध उपक्रम राबविण्यात येतात. विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयाचे आस्थापनेवर अधिकारी/ कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्यावर साधारणतः रुपये ३ कोटी ५४ लाख ९६ हजार इतका वार्षिक खर्च येतो.

विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयातर्फे अमरावती विभागातील ०५ जिल्हयातील शिक्षण विभागाशी संबधीत सर्व दुय्यम कार्यालयावर नियंत्रण ठेवण्याचे कामकाज करण्यात येते. विभागीय शिक्षण उपसंचालक, अमरावती कार्यालयाची स्थापना सन १९७१ ला झाली असुन प्रत्यक्षात सन १९७८ ला नागपूर विभागाकडुन या कार्यालयाकडे दस्तऐवज प्राप्त झालेले आहे. सद्यस्थितीत विभागामध्ये अमरावती/अकोला/वाशिम/यवतमाळ/बुलढाणा अशी एकुण ०५ जिल्हे कार्यरत आहेत. ०२ कार्यालये विभागीय स्तरावरील ३९ कार्यालये जिल्हा स्तरावरील व ०२ कार्यालये तालुका स्तरावरील आहे.

विभागीय शिक्षण उपसंचालक, अमरावती कार्यालयामध्ये खालील अधिकारी/ कर्मचारी वर्ग मंजूर आहेत. (७५ पदे)

**गट -अ -- ०२**
**गट -ब -- ०४**
**गट -क -- ६२**
**गट –ड -- ०७**

**<u>प्राथमिक शिक्षण व माध्यमिक शिक्षण :-</u>**

विभागामधील ६ ते १४ वयोगटाच्या सर्व मुला- मुलींना शिक्षण पुरविण्याच्या उद्देशाने “सर्व शिक्षा अभियान” हा महत्वकांक्षी कार्यक्रम शासनाकडुन प्राप्त होणाऱ्या सूचनेनुसार प्रभावीपणे या विभागाकडुन राबविण्यात येतो. तसेच सदर उपक्रम राबविण्याकरीता प्रकल्प

संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई हया स्वायत संस्थेकडुन अतिशय मोलाचे मार्गदर्शन या विभागास प्राप्त होते. त्या अनुषंगाने त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी या कार्यालयाकडुन तसेच विभागाकडुन करण्यात येते. प्राथमिक शिक्षणाचा प्रसार वेगाने झाल्यामुळे विभागात माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाचा विस्तारही मोठया प्रमाणात झालेला आहे. विभागामध्ये माध्यमिक व उच्चमाध्यमिक शाळा प्रामुख्याने खाजगी संस्थाकडुन चालविल्या जातात. ज्यात अनुदानित, अंशतः अनुदानित, विनाअनुदानित, कायमविना अनुदानित शाळांचा समावेश आहे. अमरावती विभागामध्ये प्रामुख्याने अमरावती स्थानिक व यवतमाळ जिल्हयात केळापुर येथे शासकीय विद्यानिकेतन कार्यरत असुन ती निवासी शाळा आहे. त्यामध्ये प्रामुख्याने आदिवासी विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो.

**<u>क्रिडा व युवक कल्याण</u> :-**

राज्य शासनाच्या शिक्षण प्रणालीमध्ये शारिरीक शिक्षण क्रीडा व युवक सेवा यांचा समावेश आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीन विकास होण्याचे दृष्टीने शासन स्तरावरुन ज्या ज्या योजना येतात त्या प्रभावीपणे राबविण्याकरीता विभाग सतत प्रयत्नशिल राहतो. या कार्यालयाचे स्तरांवरुन राष्ट्रीय सेवा योजना + २ ही योजना अतिशय प्रभावीपणे राबविण्याचे कामकाज केल्या जाते. विभागीय स्तरांवर राष्ट्रीय सेवा योजनेची ५२ युनीट कार्यरत असून त्यामध्ये ४,६०० विद्यार्थ्यांचा समावेश आहे. ०१ युनीटला शिबीरासाठी व नियमीत कार्यक्रमासाठी माध्यमिक व उच्चमाध्यमिक शिक्षण संचालनालयाचे स्तरांवरून संबधीत क.म.वि./ उ.मा.वि. यांना संगणक प्रणालीव्दारे वितरीत करण्यात येते.

**<u>विभागाची उद्दीष्टे</u> :-**

शालेय शिक्षण व क्रीडा क्षेत्रामध्ये खालील <u>उद्दीष्टांची पूर्तता करण्यास विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय कटीबध्द आहे.</u>

१) प्राथमिक शिक्षणाचा दर्जा उंचावून व त्यामध्ये जिवनोपयोगी शिक्षणाचा समावेश करणे.
२) सर्व मुला-मुलींचे प्राथमिक शिक्षण पूर्ण करणे.
३) शाळांतील विद्यार्थ्यांची गळती कमी करून १०० टक्के उपस्थितीचे उद्दीष्ट साध्य करण्या साठी शिक्षणाधिकारी (माध्यमिक/प्राथमिक) यांना आदेश वजा सुचना देणे.
४) ६ ते १४ वयोगटातील शाळा सोडलेली/ शाळेत कधी न गेलेली स्थलांतरीत मुलांकरिता पर्यायी शिक्षणाचे उपक्रम राबविणे.

५) विशेष गरजा असलेल्या मुलांना शिक्षणाची समान संधी व सहभाग मिळवून देणे.

६) मुलींच्या प्राथमिक शिक्षणासाठी विशेष कार्यक्रम राबविण्यासाठी शिक्षणाधिकारी (माध्यमिक/ प्राथमिक) यांना दिशा निर्देश देणे.

७) शालेय पोषण आहार योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी शिक्षणाधिकारी (माध्यमिक/ प्राथमिक) जिल्हा परिषदा यांना सूचना देणे.

८) शिष्यवृत्ती योजना, भाषिक/धार्मिक अल्पसंख्यांकासंबधीच्या शैक्षणिक योजना तसेच मदरसा आधुनीकीकरण योजना प्रभाविपणे राबविणेसाठी शिक्षणाधिकारी (योजना), जिल्हा परिषद कार्यालयास सूचना देणे.

९) प्राथमिक, माध्यमिक व महाविद्यालयीन शैक्षणिक पातळीपर्यंतच्या अभ्यासक्रमात शारिरीक शिक्षणाचा समावेश व विकास करणे.

१०) विद्यार्थ्यांसाठी क्रीडा स्पर्धा व मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यासंदर्भात शिक्षणाधिकारी (माध्यमिक/ प्राथमिक) जिल्हा परिषदा यांना सुचना देणे व सभा आयोजीत करणे.

११)विभागीय पातळीवर प्राथमिक, माध्यमिक, उच्चमाध्यमिक व अध्यापक विद्यालये यांचे शैक्षणिक, प्रशासकीय व आर्थिक बाबींवर पर्यवेक्षण व सनियंत्रण करणे.

१२) शालेय शिक्षण विभागाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी शालेय शिक्षण यांचेशी या विभागातील जिल्हयाचा समन्वय साधणे.

**विभागाची रचना :-**

विभागामधील अधिपत्याखालील सर्व दुय्यम कार्यालयांवर नियंत्रण ठेवण्याचे कामकाज केल्या जाते तसेच विभागीय कार्यालय या नात्याने मुख्यत्वे धोरणात्मक बाबींवर निर्णय घेण्यात येतो. कार्यालयाचे स्तरांवर ०१ कार्यालय प्रमुख, ०१ गट-अ दर्जाचे, ०४ गट-ब दर्जाचे, गट-क ६२ व गट-ड ०७ असा अधिकारी/ कर्मचारी वर्ग मंजुर आहे. कार्यालयामध्ये एकुण २२ कार्यासने कार्यरत आहे. याबाबत वृक्ष तक्ता सोबत जोडला आहे.

विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयाचे स्तरावर महत्वाचे निर्णय/ धोरणात्मक बाबी हाताळण्यात येतात. मात्र योजनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी अधिनस्त कार्यालयातील कार्यालय प्रमुख व त्यांच्या अधिपत्याखालील अधिकाऱ्यांमार्फत होते. विभागाच्या अधिपत्याखालील विभागीय स्तरावरील/ जिल्हा स्तरावरील/ तालुका स्तरावरील कार्यालये खालील प्रमाणे आहेत.

**विभागीय कार्यालये :-**

१) विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, अमरावती.

२) पीठासीन अधिकारी, शाळा न्यायाधिकरण, अमरावती.

**जिल्हा स्तरांवरील कार्यालये :-**

१) शिक्षणाधिकारी (प्राथमिक/ माध्यमिक) जिल्हा परिषद, अमरावती/अकोला/वाशिम/ यवतमाळ/बुलढाणा.

२) प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अमरावती/अकोला/वाशिम/यवतमाळ/ बुलढाणा.

३) शिक्षणाधिकारी (योजना) जिल्हा परिषद अमरावती/अकोला /वाशिम / यवतमाळ/ बुलढाणा.

४) प्राचार्य शासकीय विद्यानिकेतन, अमरावती

५) अधिक्षक, वेतन व भ.नि.नि.पथक (माध्यमिक/ प्राथमिक) अमरावती/अकोला /वाशिम / यवतमाळ/ बुलढाणा.

६) लेखाधिकारी, (शिक्षण विभाग) अमरावती/अकोला /वाशिम / यवतमाळ/ बुलढाणा.

७) शासकीय अध्यापक विद्यालय, (पुरूष) अमरावती/(जुने डिप्टी) अमरावती/अकोला (मुली)

**तालुका स्तरीय कार्यालय :-**

१) प्राचार्य, शासकीय विद्यानिकेतन, केळापूर, जि. यवतमाळ

२) प्राचार्य, शासकीय अध्यापक विद्यालय (उर्दू) बाळापूर, जि. अकोला

**कार्यपूर्तीचे वेळापत्रक :-**

विभागाच्या महत्वाच्या योजना व धोरणात्मक बाबीवर या कार्यालयाच्या स्तरावर निर्णय घेण्यात येतात. विभागाच्या विविध उद्दीष्टांची पूर्तता करण्याकरीता उपरोक्त दुय्यम कार्यालयाकडून विविध योजना, उपक्रम राबविण्यात येतात. या उपक्रमाची माहिती व त्याबाबतचे कार्यपूर्तीचे वेळापत्रकाचा समावेश अधिनस्त दुय्यम कार्यालयातील नागरीकांच्या सनदेमध्ये करण्यात येईल. ही माहिती दुय्यम कार्यालयाकडून स्वतंत्रपणे प्रसिध्द करण्यात येईल, तशा सुचना सर्व अधिनस्त दुय्यम कार्यालयांना या कार्यालयाचे परिपत्रक्र क्रमांक आस्था/अ/२४०३४/०९, दिनांक १४/०९/२००९ अन्वये निर्गमित करण्यात आलेले आहेत.

**माहितीची सुलभता** :-

आधुनिक काळाची गरज म्हणून विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, अमरावती तसेच अधिनस्त असलेल्या सर्व दुय्यम कार्यालयांची माहिती संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्याचे दृष्टीने प्रयत्न करण्यात येत आहे. या विभागाच्या कामाची प्रचंड व्याप्ती लक्षात घेता तसेच दुय्यम कार्यालयामार्फत करण्यात येणारे कामकाजाची माहिती सर्वसाधारण जनतेपर्यंत उपलब्ध व्हावी या दृष्टीने प्रत्येक कार्यालय प्रमुखांनी त्यांची स्वतंत्र वेबसाईट तयार करुन प्रसिध्द करण्याबाबत कार्यालय प्रमुखांच्या सभेमध्ये दिशानिर्देश देण्यात आलेले आहे. विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयाची वेबसाईट सुरु करण्यात आलेली आहे.